# अभंग - ज्ञानेश्वरी
## अध्याय सातवा

श्रीभगवानुवाच–
मय्यासक्तमना: पार्थ योगं युञ्जन्मदाश्रय: ।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥१॥

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषत: ।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥२॥

ऐका मग बोले । पार्थासी अनंत । आतां योगयुक्त । झालासी तूं ॥१॥
तरी जेणें ज्ञानें । समग्रातें मज । अर्जुना सहज । जाणशील ॥२॥
* विज्ञानासहित । ज्ञान तें सांगेन । तळहातीं जाण । रत्न जैसें ॥३॥
करावें तें काय । जाणोनि विज्ञान । ऐसें तुझें मन । सांगे जरी ॥४॥
तरी आधीं तें चि । जाणणें नि:शंक । असे आवश्यक । [1] सर्वथैव ॥५॥
मग पार्था, पाहें । ज्ञानाचिये वेळे । झांकती गा डोळे । जाणिवेचे ॥६॥
टेकतां [2] तीरास । नाव जैसी पार्था । ढळे ना सर्वथा । स्वभावें चि ॥७॥
प्रवेशे ना जेथें । तैसी ती जाणीव । मागें वळे धांव । विचाराची ॥८॥
[3] पांगुळतें जेथें । तर्काचें चातुर्य । तें चि ज्ञान होय । धनंजया ॥९॥
त्याहूनि इतर । जें का प्रापंचिक । विज्ञान तें देख । नि:संदेह ॥१०॥
धनुर्धरा सत्य । मानणें विज्ञान । तें चि तें अज्ञान । हें हि जाण ॥११॥
[4] आघवें अज्ञान । जेणें हारपेल । [5] समूळ जळेल । विज्ञान हि ॥१२॥

---

१. पूर्णपणें. २ कांठाला. ३ लुळें पडतें. ४ सगळें. ५ मुळासकट. * परिशिष्ट पहा.

आणिक तें ज्ञान । सर्वथा आपण । स्वरूपें होवोन । राहूं जेणें ।।१३।।
जेणें वक्त्याचें तों । खुंटतें व्याख्यान । होतें समाधान । श्रोतयांचें ।।१४।।
जेणें [१] सान-थोर । ऐसा नुरे भेद । गूढ जें [२] अभेद–। ज्ञान-वर्म ।।१५।।
तें चि आतां बोलीं । होईल प्रकट । ऐसे बोल स्पष्ट । बोलेन मी ।।१६।।
घडतां चि ज्याचें । अल्प हि दर्शन । मनोरथ पूर्ण । होती बहु ।।१७।।

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वत: ।।३।।

लाभावें हें ज्ञान । तीव्र इच्छा ऐसी । धरोनि मानसीं । झटे जो का ।।१८।।
पार्था सहस्रांत–। ऐसा एखादा च । आढळे गा साच । यत्नशील ।।१९।।
ऐशा यत्नशीला–। माझारीं हि कोणी । होय पूर्ण ज्ञानी । विरळा च ! ।।२०।।
भरलें त्रैलोक्य । तयांतील शूर । एक एक वीर । निवडोनि ।।२१।।
लक्षावधि सेना । उभारिती साच । परी एखादा च । तयांमाजीं ।।२२।।
साहोनि [३] खड्गाचे । घाव रणांगणीं । बैसे सिंहासनीं । [४] जयश्रीच्या ।।२३।।
तैसे कोट्यवधि । [५] रिघती साधक । महापूरीं देख । आस्थेचिया ।।२४।।
परी एखादा च । गांठितो साचार । पार्था, पैल तीर । प्राप्तिरूप ।।२५।।
म्हणोनि हें ज्ञान । नव्हे साधारण । ह्याचें थोरपण । वर्णनीय ।।२६।।
परी करूं पुढें । तयाचें वर्णन । प्रस्तुत विज्ञान । ऐकें आतां ।।२७।।

भूमिरापोऽनलो वायु: खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ।।४।।

*महत्तत्त्वादिक । पार्था, माझी माया । जैसी पडछाया । निजांगाची ।।२८।।
मूळमायेतें ह्या । प्रकृति हें नांव । अष्टविध भाव । असे जिचा ।।२९।।
धनंजया ह्या चि । प्रकृतिपासोन । होतसे निर्माण । त्रैलोक्य हें ।।३०।।
तुझ्या मनीं ऐसा । जरी अभिप्राय । कैसी भिन्न होय । अष्टधा ही ।।३१।।
तरी तें चि आतां । ऐक विवेचन । सांगतसें भिन्न । आठी भाग ।।३२।।
[६] व्योम वायु तेज । उदक धरणी । मन बुद्धि आणि । अहंकार ।।३३।।

---

१ लहानमोठें. २ अद्वैत ज्ञानाची खूण. ३ तरवारीचे. ४ विजयाच्या. ५ शिरतात. ६ आकाश.

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥५॥

पार्था, आठांची ह्या । जी कां *साम्यावस्था । प्रकृति ती श्रेष्ठा । दुजी माझी ॥३४॥
*परा प्रकृतीतें । जीव ऐसें नांव । जडातें सजीव । करी जी का ॥३५॥
[१] चेतनेसी जागें । करोनि मनातें । लावी मानायातें । शोक मोह ॥३६॥
हिचें [२] सन्निधान । म्हणोनियां ज्ञान । होतसे उत्पन्न । बुद्धिअंगीं ॥३७॥
अहंकाराचिया । कौशल्यें संपूर्ण । जगासी धारण । करी हीच ॥३८॥

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।
अहं कृत्स्नस्य जगत: प्रभव: प्रलयस्तथा ॥६॥

स्थूळ प्रकृतीशीं । कौतुकें [३] संयुक्त । पार्था, जेव्हां होत । प्रकृति ही ॥३९॥
प्राणिवर्गरूप । नाण्यांची केवळ । तेव्हां टांकसाळ । सुरू होय ॥४०॥
११ मग *चतुर्विध । आकृतींचे ठसे । उमटती कैसे । आपोआप ॥४१॥
तयांचें तों मोल । सारखें च जाण । परी भिन्न भिन्न । आकार ते ॥४२॥
*लक्ष चौऱ्यायशीं । योनींचे आकार । सहजें तयार । होती तेथें ॥४३॥
ऐसे आणिक हि । आकार ते किती । नेणों तया [४] मिति । पंडुसुता ॥४४॥
ऐशा असंख्यात । आकृतींनीं सारा । मायेचा गाभारा । भरे कैसा ॥४५॥
योग्यतेनें एक । ऐसीं हीं अनेक । पंचभूतात्मक । नाणीं जीं का ॥४६॥
तयांचिया मग । समृद्धीचें साच । घेई प्रकृति च । मोजमाप ॥४७॥
आखोनियां नाणीं । विस्तारिते पाहीं । मग आटणी हि । ती च करी ॥४८॥
कर्माकर्माचिया । [५] व्यापारीं मध्यें च । [५] प्रवर्तवी साच । प्राणियासी ॥४९॥
असो हें रूपक । सांगेन सरळ । तुज आकळेल । ऐसें आतां ॥५०॥
करी पार्था, नाम–। रूपाचा विस्तार । सर्वथा साचार । प्रकृति च ॥५१॥
आणि प्रकृति तों । भासे माझ्या ठायीं । अन्यथा हें नाहीं । धनंजया ॥५२॥
म्हणोनि जगासी । आदि मध्य अंत । एक मी निभ्रांत । ऐसें जाण ॥५३॥

मत्त: परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।

---

*परिशिष्ट पहा. १ जाणिवेला. २ जवळ असणे. ३ मिसळलेली. ४ माप; संख्या. ५ उद्योग करायला लावते.



D:\Dyaneshwari_2007\ADA7_159-178....161

मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥७॥

मृगजळाचें तें । पाहूं जातां मूळ । सूर्य चि केवळ । नव्हे [१] रश्मि ॥५४॥
तैसें आदिमाये–। प्रकृतिपासोन । जाहली निर्माण । जी का सृष्टि ॥५५॥
तियेचा निरास । करोनि पाहतां । मूळ तें तत्त्वतां । मी च आहें ॥५६॥
म्हणोनि * उत्पत्ति । स्थिति आणि लय । मजमाजीं होय । ऐशा रीती ॥५७॥
पार्था, करीं मी ह्या । विश्वासी धारण । जैसा [२] मणिगण । [३] सूत्रामाजीं ॥५८॥

रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययो: ।
प्रणव: सर्ववेदेषु शब्द: खे पौरुषं नृषु ॥८॥

पुण्यो गन्ध: पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।
जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥९॥

म्हणोनियां जळा–। माजीं जो का रस । किंवा असे स्पर्श । वायूमाजीं ॥५९॥
चंद्रसूर्यामाजीं । किंवा जो प्रकाश । मी चि तो नि:शेष । जाण ऐसें ॥६०॥
पृथ्वीचिया ठायीं । स्वभावतां शुद्ध । असे जो सुगंध । तो हि मीच ॥६१॥
आकाशाच्या ठायीं । शब्द मी साचार । असें मी ॐकार । वेदांमाजीं ॥६२॥
नराचिया ठायीं । नरत्व जें थोर । अहंतेचें सार । असे जें का ॥६३॥
[३] पौरुष तें देखें । धनुर्धरा मी च । तत्त्व तुज साच । सांगतसें ॥६४॥
आणि अग्नि ऐशा । नावें भासमान । [४] तेज-प्रावरण । असे जें का ॥६५॥
सारितां तें दूर । स्वयंसिद्ध तेज । उरे तें सहज । मीच आहें ॥६६॥
नानाविध योनी–। माजीं धनंजया । प्राणी जन्मोनियां । त्रैलोक्यांत ॥६७॥
आपुलें जीवन । कंठिती साचार । घेवोनि आहार । आपुलाले ॥६८॥
राहती ते कोणी । सेवोनि पवन । कोणी एक तृण । भक्षोनियां ॥६९॥
अन्नाधारें कोणी । राहती केवळ । प्राशोनियां जळ । कोणी एक ॥७०॥
स्वभावानुसार । ऐसें भिन्न भिन्न । दिसे जें जीवन । प्राणियांचें ॥७१॥
तया भिन्न भिन्न । जीवनीं संपूर्ण । असें गा [५] अभिन्न । मी चि एक ॥७२॥

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।

---

*परिशिष्ट पहा. १ किरण. २ दोऱ्यांत मणी. ३ पराक्रम; पुरुषत्व. ४ तेजाला पांघरूण. ५ एकरूप.

बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥१०॥
बलं बलवतामस्मि कामरागविवर्जितम् ।
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥११॥

जें का सृष्ट्यारंभीं । [1] शून्याच्या अंकुरें । सर्वथा विस्तारे । आत्मतत्त्व ॥७३॥
सृष्टीचा त्या लय । होतां तिये वेळीं । अक्षरें जें गिळी । ॐकाराचीं ॥७४॥
विश्वा चि सारिखें । दिसे जें साचार । असे विश्वाकार । जोंवरी हा ॥७५॥
मग जें का * महा–। प्रळय होतांच । स्वयें राहे साच । निराकार ॥७६॥
अर्जुना, जें ऐसें । अनादि सहज । तें मी विश्वबीज । आत्मतत्त्व ॥७७॥
तुजलागीं ज्ञान । दाविलें हें स्पष्ट । घेसी जरी नीट । आकळोनि ॥७८॥
तरी * आत्मानात्म–। विचारें आगळा । उपयोग भला । देखशील ॥७९॥
प्रसंग सांडोन । न बोलें मी आतां । सांगेन तत्त्वतां । संक्षेपें हें ॥८०॥
तपस्व्यांच्या ठायीं । असे जें का * तप । तें हि माझें रूप । जाण पार्था ॥८१॥
बळवंतांमाजीं । बळ जें [2] अढळ । बुद्धि जी केवळ । बुद्धिमंतीं ॥८२॥
भूतांचिया ठायीं । असे जो का [3] काम । तो मी आत्माराम । म्हणे ऐसें ॥८३॥
परी जेणें कामें । धर्माचें महत्त्व । वाढे ऐसें [4] सत्त्व । असे ज्याचें ॥८४॥
इंद्रियानुकूल । वर्ते हें तों खरें । काम तो प्रसारें । विकारांच्या ॥८५॥
धर्मासी विरुद्ध । परी तें वर्तन । न व्हावें म्हणोन । [5] दक्ष राहे ॥८६॥
कर्तव्यकर्माचा । राजमार्ग धरी । कुमार्ग अव्हेरी । निषिद्धाचा ॥८७॥
तेविं नियमाचा । मशालजी नीट । दाखवीत वाट । सवें चाले ॥८८॥
ऐशा रीती पार्था । प्रवर्ते हा काम । म्हणोनियां धर्म । पूर्ण होय ॥८९॥
मग तो भोगितो । संसार सकळ । मोक्ष-तीर्थांतील । जणूं मोतीं ॥९०॥
वेदगौरवाच्या । मंडपावरील । कर्मरूप वेल । असे जी का ॥९१॥
फळा-फुलांसंगें । भिडे ती मोक्षास । तोंवरी तियेस । वाढवी जो ॥९२॥
ऐसा जो नेमस्त । भूतां बीजरूप । तो मी म्हणे बाप । योगियांचा ॥९३॥
एकैक हें आतां । सांगूं किती फार । समस्त साचार । वस्तुजात ॥९४॥

---

* परिशिष्ट पहा. १ आकाशरूपी कोंभानें. २ दृढ; पक्के. ३ विषयवासना. ४ स्वभाव; थोरपणा. ५ सावध.

आलें आकारास । माझ्या चि पासोन । स्वभावतां जाण । धनंजया ॥९५॥

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये ।
मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥१२॥

आणिक हि जे जे । *विकार सात्त्विक । रज-तमादिक । तैसे सर्व ॥९६॥
अर्जुना माझ्या चि । स्वरूपापासून । जाहले निर्माण । ओळख तूं ॥९७॥
जैसी स्वप्नाचिया । डोहांमाजीं साच । बुडे ना कधीं च । जागृति ती ॥९८॥
तैसे माझ्या ठायीं । जाहले तरी हि । सर्वथा मी नाहीं । तयांमाजीं ॥९९॥
गोठोनियां रस । तयाचें सहज । भरींव तें बीज । होय जैसें ॥१००॥
आणि तयासी च । फुटोनि अंकुर । काष्ठ तें साचार । बने त्याचें ॥१०१॥
सांगें मग तया । काष्ठाचिया ठायीं । पार्था असे काई । बीजपण ॥१०२॥
विकार हे तैसे । माझ्या चि पासोन । परी तयांहून । वेगळा मी ॥१०३॥
जैसें नभामाजीं । [१] उद्भवे [२] आभाळ । आभाळीं केवळ । नभ नाहीं ॥१०४॥
किंवा मेघांमाजीं । राहतें उदक । उदकांत देख । मेघ नाहीं ॥१०५॥
मग [३] तोयाचें त्या । होवोनि घर्षण । तेज तयांतून । प्रकटे जें ॥१०६॥
तया लखलखीत । विजेमाजीं काय । राहतें तें तोय । सांगें मज ॥१०७॥
अग्निपासोनियां । [४] धूम जैसा होय । परी धूमीं काय । अग्नि राहे ? ॥१०८॥
विकार हे तैसे । माझे चि साचार । परी मी विकार । [५] नोहें पार्था ॥१०९॥

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥१३॥

जैसें तें शेवाळ । जन्मोनि उदकीं । झांकोनियां टाकी । उदकातें ॥११०॥
मेघांचिया योगें । किंवा धनंजया । लोपे जैसें वायां । आकाश तें ॥१११॥
[६] लटिकें तें स्वप्न । परी वाटे [७] साच । स्वाधीन होतां च । निद्रेचिया ॥११२॥
होऊं देतें काय । मग तिये वेळीं । आपणा आपुली । आठवण ॥११३॥
डोळेयाचें पाणी । डोळां चि गोठोन । वाढे तयांतून । *पडळ जें ॥११४॥
तें चि मग काय । टाकी ना किरीटी । गिळोनियां दृष्टि । डोळेयांची ॥११५॥

---

*परिशिष्ट पहा. १ निर्माण होतो. २ ढग. ३ पाण्याचें. ४ धूर. ५ नाहीं. ६ खोटें. ७ खरें.

तैसी त्रिगुणांनीं । युक्त जी का माया । पार्था, पडछाया । माझी च ती ।।११६।।
माझी च ती परी । [1] प्रावरण साच । होवोनि माझ्या च । आड आली ।।११७।।
म्हणोनियां प्राणी । जाणती ना मातें । माझे मद्रूप ते । होती चि ना ।।११८।।
[2] मुक्ताफळें जैसीं । जळीं चि जन्मोन । न जाती विरोन । जळामाजीं ।।११९।।
लिंपोनियां माती । घडिला जो घट । मिळे तो मातींत । मेळवितां ।।१२०।।
परी लागतां च । विस्तवाची [3] आंच । [4] भिन्नता ये साच । तयालागीं ।।१२१।।
तैसें [5] भूतजात । सर्व हे माझे च । अवयव साच । धनंजया ।।१२२।।
परी मायायोगें । जीवदशे आले । पाहें कैसे झाले । विषयांध ।।१२३।।
* अहं-ममत्वाच्या । भ्रांतींत गुंतोन । गेले विसरोन । मजलागीं ।।१२४।।
म्हणोनि माझे चि । मज नोळखिती । माझे चि न होती । मद्रूप ते ।।१२५।।

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ।।१४।।

महत्तत्त्वादिक । जी का माझी माया । पार्था, तरोनियां । सर्वथा ती ।।१२६।।
कैसी व्हावी येथें । भ्रांत जीवाप्रति । मद्रूपाची प्राप्ति । ऐक आतां ।।१२७।।
ब्रह्मगिरीचिया । अर्ध कड्यामाजीं । पावें उगम जी । माया-नदी ।।१२८।।
* आदिसंकल्पाच्या । जळाची उसळी । घेवोनि निघाली । जंव पुढें ।।१२९।।
तंव तींत महा-। भूतांचा तो भला । लहानसा आला । बुडबुडा ।।१३०।।
सृष्टिविस्ताराच्या । मग जी का ओघें । काळगतीवेगें । वाढोनियां ।।१३१।।
* प्रवृत्ति-निवृत्ति । उंच दोन्ही तट । कैसी [6] ओसंडीत । [6] वाहूं लागे ।।१३२।।
जी का * गुणरूपी । मेघवृष्टिभरें । भरे महा-पूरें । मोहाचिया ।।१३३।।
यम-नियमांचीं । गांवें वाहवीत । जाय घोघावत । पुढें पुढें ।।१३४।।
द्वेषाचे भोंवरे । दाटोनियां जींत । वळणें पडत । * मत्सराचीं ।।१३५।।
आणि प्रमादादि । मोठमोठे मासे । तळपती कैसे । माझारीं च ।।१३६।।
जेथें प्रपंचाचीं । वांकणें अमूप । स्वभावानुरूप । जीवांचिया ।।१३७।।
कर्म-अकर्मांचे । खळाळते पूर । जेथें अनिवार । लोटती गा ।।१३८।।

---

* परिशिष्ट पहा.　१ पांघरूण.　२ मोत्यें.　३ उष्णता.　४ वेगळेपणा.　५ सर्व प्राणी.　६ भरून वहाते.

आणि कैसा सुख–। दु:खांचा तो केर । तरंगे चौफेर । तयावरी ॥१३९॥
जियेमाजीं रति–। सुखाचिया बेटा । आदळती लाटा । कामाचिया ॥१४०॥
नाना जीवरूप । फेंस तो उदंड । संचला अखंड । दिसे तेथें ॥१४१॥
अहंकाराचिया । प्रवाह-धारेंत । उसळोनि येत । *मद-त्रय ॥१४२॥
विषयांच्या [१] उर्मी । एकावरी एक । क्षणोक्षणीं देख । उड्या घेती ॥१४३॥
जन्ममरणाचे । खळगे पाडीत । जाती उदयास्त–। रूप लोंढे ॥१४४॥
पंचभूतात्मक । देहरूपी किती । तेथें होती जाती । बुडबुडे ॥१४५॥
[२] संमोह [३] विभ्रम । जियेमाजीं मासे । गिळिती आमिषें । धैर्यरूप ॥१४६॥
तेविं ठायीं ठायीं । जेथें वक्रगती । भोंवरे भोंवती । अज्ञानाचे ॥१४७॥
भ्रांतिरूप पाणी । गढूळ जें अति । म्हणोनि फसती । जीव जेथें ॥१४८॥
आस्थेचिया गाळा–। माजीं रुतोनियां । इच्छिती ते वायां । स्वर्गप्राप्ति ॥१४९॥
कैसा रजोगुण । वाहे खळाळत । गाजूं लागे तेथ । स्वर्गलोक ॥१५०॥
तमाचे प्रवाह । जेथें जोरदार । सत्त्वाचें गंभीर । स्थिरपण ॥१५१॥
किंबहुना ऐसी । मायानदी द्वाड । तरावया जड । जड जीवां ॥१५२॥
पुनर्जन्मरूपी । उसळतां लोट । होवोनि आघात । सत्यलोकीं ॥१५३॥
तेथींचे बुरूज । ढांसळोनि जाती । धोंडे कोसळती । ब्रह्मांडाचे ॥१५४॥
पाणियाच्या वेगें । वाहे अनावर । न ओसरे पूर । आज हि तो ॥१५५॥
ऐसा हा दुस्तर । पार्था मायापूर । तरेल साचार । कोण कैसा ॥१५६॥
[४] स्वयंबुद्धीचिया । बाहुबळें कोणी । तरावें म्हणोनि । प्रवेशले ॥१५७॥
परी तेथें पाहीं । उरला चि नाहीं । ठावठिकाणा हि । तयांचा तो ॥१५८॥
झालों आम्ही ज्ञानी । ऐसे अभिमानी । डोहीं च बुडोनि । गेले कोणी ॥१५९॥
वेदत्रयाची तों । बांधोनि सांगड । आणि सवें धोंड । अहंतेची ॥१६०॥
घेवोनि जे कोणी । येथें तरूं गेले । तयांसी गिळिलें । [५] मद-मीनें ॥१६१॥
मदनाच्या कासे । लागले जे कोणी । कमर कसोनि । तारुण्याची ॥१६२॥
विषयाच्या [६] नक्रें । मारोनियां मिठी । तयांसी शेवटीं । चघळिलें ॥१६३॥

---

*परिशिष्ट पहा. १ लाटा. २ अविवेक. ३ गोंधळ. ४ आपल्याच बुद्धीच्या.
५ मदरूपी माशानें. ६ मगराने.

आतां वार्धक्याच्या । लाटेमाजीं पाश । असे मतिभ्रंश-। रूप जो का ॥१६४॥
तया पाशामाजीं । कैसे अडकोन । जाती जखडोन । चौबाजूंनीं ॥१६५॥
शोकाचिया कांठा-। वरी आदळत । क्रोध-भोंवऱ्यांत । घेती घेर ॥१६६॥
तेथोनियां वर । येतां तियेकडे । टोंचिती गिधाडें । संकटांचीं ॥१६७॥
मग दु:खाचिया । कर्दमीं माखले । रेवेंत रुतले । मृत्यूचिया ॥१६८॥
जन्मोनियां पार्था । वायां गेले ऐसे । कामाचिया कासे । लागले जे ॥१६९॥
कोणी यज्ञादिक-। क्रियारूप पेटी । बांधोनियां पोटीं । तरूं गेले ॥१७०॥
स्वर्गसुखाचिया । [१] कपारीं ते पार्था । राहिले सर्वथा । गुर्फटोनि ॥१७१॥
कर्म-बाहुबळीं । ठेवोनि विश्वास । मोक्ष गांठायास । धांवले जे ॥१७२॥
विधिनिषेधाच्या । दीर्घ भोंवऱ्यांत । अखंड भोंवत । राहिले ते ॥१७३॥
वैराग्याची नाव । प्रवेशे ना जेथें । तेविं विवेकातें । नुरे ठाव ॥१७४॥
क्वचित् पार्था, [२] योगें । तरूं ये कांहींशी । दुस्तर ही ऐशी । मायानदी ॥१७५॥
आतां जीवाचिया । अंगबळें येथें । तरूं पाहणें तें । कैसें ऐक ॥१७६॥
करी जो कुपथ्य । तयालागीं व्याधि । पार्था, जरी कधीं । जिंकवेल ॥१७७॥
किंवा सज्जनासी । दुर्जनाची बुद्धि । देखें जरी कधीं । आकळेल ॥१७८॥
किंवा लोभियासी । लाभतां संपत्ति । जरी सांडोनि ती । जाववेल ॥१७९॥
माशालागीं गळ । जरी गिळवेल । चोरासी भियेल । सभा जरी ॥१८०॥
किंवा [३] भेकडासी । पिशाच्च वळेल । पाडस तोडील । जाळें जरी ॥१८१॥
किंवा मुंगी जरी । मेरू ओलांडील । जीवां तरवेल । तरी माया ! ॥१८२॥
म्हणोनियां जैसी । कामुकातें पार्था । सर्वथा [४] वनिता । जिंकवेना ॥१८३॥
तैसी मायामय । नदी ही दुस्तर । जीवांसी साचार । तरवे ना ॥१८४॥
येथें एक चि ते । तरले सहज । भजले जे मज । सर्वभावें ॥१८५॥
असतां चि [५] ऐल-। थडीं धनंजया । संपलें गा तयां । माया-जळ ॥१८६॥
सद्‌गुरु नावाडी । तारक नि:शंक । उभा असे देख । जयांपुढें ॥१८७॥
* आत्मानुभूतीची । कसोनियां कास । सिद्ध तरायास । जाहले जे ॥१८८॥

---

* परिशिष्ट पहा.　१ डोंगराच्या खोबणींत.　२ योगमार्गानें.　३ भित्र्याला.　४ स्त्री.　५ ह्याच तीरावर.

* आत्मनिवेदन । तराफा तो भला । पार्था, सांपडला । जयांलागीं ॥१८९॥
अहंतेचा भार । फेंकोनियां दूर । चुकवोनि धार । विकल्पाची ॥१९०॥
प्रपंचप्रीतीच्या ओहोटीचें पाणी । तें हि तपासोनि । नीटपणें ॥१९१॥
ऐक्याचा उतार । दिसतां उघड । बोधाची सांगड । जोडोनियां ॥१९२॥
मग निवृत्तीच्या । पैल तीरा भले । कैसे ते निघाले । झेपावत ॥१९३॥
वैराग्याच्या हातें । तोडीत तें जळ । सोऽहंभाव बळ–। संपन्न ते ॥१९४॥
पोहत पोहत । पातले शेवटीं । मुक्तीचिया [१] तटीं । अनायासें ॥१९५॥
ऐशापरी मज । भजले सर्वथा । तरले ते पार्था । माझी माया ॥१९६॥
परी ऐसे भक्त । नाहींत बहुत । विरळा चि येथ । आढळती ! ॥१९७॥

न मां दुष्कृतिनो मूढा: प्रपद्यन्ते नराधमा: ।
माययाऽपहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिता: ॥१५॥

चतुर्विधा भजन्ते मां जना: सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥१६॥

अन्य जे बहुत । तयांतें निभ्रांत । लागलेंसें भूत । अहंतेचें ॥१९८॥
म्हणोनियां तयां । नाहीं आत्मज्ञान । झालें विस्मरण । स्वरूपाचें ॥१९९॥
मग नियमाच्या । वस्त्राचें हि भान । नुरे तयां जाण । तिये वेळीं ॥२००॥
जाहले निर्लज्ज । आतां तयांप्रति । [२] भावी अधोगति । जाणवे ना ॥२०१॥
करूं नये ऐसें । जें जें म्हणे वेद । वागती [३] स्वच्छंद । करोनि तें ॥२०२॥
जया कार्या आले । देहग्रामीं येथ । सर्व तो कार्यार्थ । सांडोनियां ॥२०३॥
इंद्रियग्रामाच्या । राजमार्गीं देख । कामक्रोधादिक । मेळवोनि ॥२०४॥
अहंममत्वाची । व्यर्थ बडबड । कैसी ते उदंड । चालविती ॥२०५॥
दु:खशोकादिक । करिती आघात । तयांची तों खंत । नसे मनीं ॥२०६॥
सांगावया येथें । कारण तें हेंच । कीं ते झाले साच । [४] मायाग्रस्त ॥२०७॥
म्हणोनि ते मातें । मुकले सर्वथा । आतां ऐक कथा । मद्भक्तांची ॥२०८॥
ज्यांनीं आत्महित । केलें वृद्धिंगत । ऐसे माझे भक्त । [५] चतुर्विध ॥२०९॥

---

*परिशिष्ट पहा. १ कांठावर. २ पुढें होणारी. ३ मनास वाटेल तसें. ४ मायेने ग्रासलेले. ५ चार प्रकारचे.

पहिला तो [१] आर्त । [२] जिज्ञासु तो दुजा । यत्नशील तिजा । परमार्थी ॥२१०॥
अर्जुना संपूर्ण । ज्ञानाचें [३] निधान । चवथा तो जाण । भक्त माझा ॥२११॥

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रिय: ॥१७॥

कष्टतां संसारीं । व्हावें दु:खमुक्त । म्हणोनि तो आर्त । भजे मातें ॥२१२॥
भजे मातें पार्था । जिज्ञासु तो जाण । व्हावें माझें ज्ञान । म्हणोनियां ॥२१३॥
तिजा तो [४] अर्थार्थी । करी माझी भक्ति । लक्षूनियां प्राप्ति । परमार्थाची ॥२१४॥
मग स्वभावें चि । चौथियाच्या ठायीं । कर्तव्य तें कांहीं । उरे चि ना ॥२१५॥
म्हणोनि जो ज्ञानी । तो चि एक भक्त । जाण हें निभ्रांत । धनंजया ॥२१६॥
ज्ञानाचा प्रकाश । म्हणोनियां देख । भेदाचा काळोख । नाहीं तया ॥२१७॥
तया झाली प्राप्ति । *सायुज्याची साच । होवोनियां मी च । भजे मातें ॥२१८॥
स्फटिकाचे ठायीं । उदकाचा देख । आभास क्षणैक । होय जैसा ॥२१९॥
मद्रूप तो ज्ञानी । तैसा इतरांतें । भक्त ऐसा वाटे । देहाकारें ॥२२०॥
परी तें कौतुक । ज्ञानियाचें साच । न ये गुंफितां च । शब्दांमाजीं ॥२२१॥
जैसा होतां वायु । आकाशीं विलीन । नुरे वायुपण । वेगळें तें ॥२२२॥
तैसा चि तो मिळे । मद्रूपीं संपूर्ण । मग भक्तपण । उरे कोठें ॥२२३॥
जरी हालवोनि । पाहिला पवन । तरी च तो भिन्न । नभाहूनि ॥२२४॥
गगन-स्वरूप । एऱ्हवीं तो जाण । स्वभावें संपूर्ण । असे जैसा ॥२२५॥
तैसा करी जेव्हां । कर्में शारीरिक । भक्त ऐसा देख । गमे तेव्हां ॥२२६॥
परी धनंजया । *स्वानुभूतियोगें । होय तो निजांगें । मद्रूप चि ॥२२७॥
तया ज्ञानोदय । जाहला म्हणोनि । मज आत्मा मानी । आपुला तो ॥२२८॥
आत्मा चि तो माझा । ऐसें मी हि तया । उचंबळोनियां । मग म्हणें ॥२२९॥
जीवापलीकडे । स्व-रूपाची खूण । तीतें आकळोन । [५] वावरे जो ॥२३०॥
पार्था, देहाधारी । असे तो म्हणोन । काय मजहून । भिन्न होय ? ॥२३१॥

उदारा: सर्व ऐवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।

---

* परिशिष्ट पहा. १ पीडित. २ जाणूं इच्छिणारा. ३ ठेवा. ४ (परम) अर्थाची इच्छा करणारा.
५ व्यवहार करतो.

आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥१८॥

म्हणोनि कोणी हि । झाले माझे भक्त । साधावया हित । आपुलालें ॥२३२॥
तरी जया मी च । आपुलासा मानीं । ऐसा भक्त ज्ञानी । एक चि तो ॥२३३॥
दुभत्याची आस । ठेवोनियां फांस । बांधिती पायास । [१] धेनूचिया ॥२३४॥
परी दोरेंवीण । [२] सुदृढ तो साचा । कैसा वासराचा । [३] स्नेह-पाश ! ॥२३५॥
तन-मन-प्राणें । दुजें कांहीं नेणे । देखे त्यातें म्हणे । माय माझी ॥२३६॥
ऐसा एकभाव । जाणोनि वत्साचा । धेनूसी हि त्याचा । फुटे पान्हा ॥२३७॥
म्हणोनियां साच । बोल ते यथार्थ । देखा रमानाथ । बोलिला जे ॥२३८॥
असो मग देव । म्हणे पंडुसुता । दुजे भक्त आतां । वर्णिले जे ॥२३९॥
ते हि सर्व आम्हां । आवडती भले । परी ते आगळे । ज्ञानी भक्त ॥२४०॥
सागरातें नदी । मिळोनियां जातां । वळे ना सर्वथा । माघारी ती ॥२४१॥
तैसा ज्ञानी भक्त । जाणोनियां मातें । पाहों प्रपंचातें । विसरला ॥२४२॥
हृदय-गुहेंत । तयाचिया चांग । उद्भवे गंगौघ । [४] प्रतीतीचा ॥२४३॥
स्वभावें तो मग । मज मिळतां च । मद्रूपता साच । आली तया ॥२४४॥
पार्था, आतां मी च । झाला तो साचार । सांगूं काय फार । बोलोनियां ॥२४५॥
ज्ञानी भक्त माझा । आत्मा चि तो जाण । [५] वस्तुतां ही खूण । न बोलावी ॥२४६॥
न बोलावी परी । दाविली बोलोन । गेलों मी भुलोन । काय करूं ! ॥२४७॥

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥१९॥

कीं तो विषयांच्या । दाट झाडींतून । संकटें टाळून । * षड्रिपूंचीं ॥२४८॥
सद्वासनारूप । पहाडावरती । येवोनि निश्चितीं । ठाकला गा ॥२४९॥
निषिद्ध कर्माचा । जो का आडमार्ग । सर्वथा तो मग । डावलोनि ॥२५०॥
धरोनि सत्संग । स्वीकारोनि चांग । सरळ सन्मार्ग । सत्कर्मांचा ॥२५१॥
आणि फलाशेचें । जें का पादत्राण । दूर तें फेंकोन । [६] अनवाणी ॥२५२॥
करितां प्रवास । शतावधि जन्म । न गणोनि * कर्म-। फल-हेतु ॥२५३॥

---

१ गाईच्या. २ घट्ट; पक्का. ३ प्रेमाचें बंधन. ४ आत्मानुभवाचा. ५ खरोखर. ६ उघड्या पायांनी.

एकला चि सर्व–। संग-परित्याग । करोनियां चांग । धांव घेतां ॥२५४॥
* देहतादात्म्याची । संपोनियां रात । जाहली प्रभात । * कर्मक्षयें ॥२५५॥
गुरुकृपारूप । उजळली [1] उषा । तेणें दाही दिशा ॥ तेजोमय ॥२५६॥
[2] ज्ञान-बालार्काचा । होतां चि उदय । देखे तो ऐश्वर्य । ब्रह्मैक्याचें ॥२५७॥
मग जेथें पाहे । तेथें मीच आहें । आणि स्वस्थ राहे । तरी मीच ॥२५८॥
असो हें सर्वत्र । तयालागीं पाहीं । दुजें कांहीं नाहीं । माझ्याविण ॥२५९॥
पार्था, देखें घट । बुडतां डोहांत । जळ जैसें आंत । बाहेर तें ॥२६०॥
तैसा ज्ञानी भक्त । राहे माझ्या ठायीं । आणि तया मी हि । अंतर्बाह्य ॥२६१॥
सर्वथा जी ऐसी । शब्दातीत स्थिति । बोलीं बोलतां ती । न ये साच ॥२६२॥
म्हणोनि हें राहो । देखे तो साचार । ज्ञानाचें अपार । [3] भाण्डार गा ॥२६३॥
मग ज्ञानरूप । होवोनि आपण । स्वभावें स्वाधीन । करी विश्व ॥२६४॥
संपूर्ण हें विश्व । वासुदेवमय । ऐसा चि प्रत्यय । आला तया ॥२६५॥
म्हणोनि तो ज्ञानी । भक्तांमाजीं राजा । जाण * कपिध्वजा । निश्चयेसीं ॥२६६॥
प्रतीति-भांडारीं । जयाच्या साचार । विश्व चराचर । सांठवलें ॥२६७॥
ऐसा तो महंत । श्रेष्ठ ज्ञानी भक्त । दुर्लभ बहुत । धनुर्धरा ॥२६८॥
जयांचीं भजनें । परी भोगासाठीं । ऐसे भक्त होती । [4] बहुवस ॥२६९॥
आली आशारूप । नेत्ररोगें पार्था । दृष्टीसि मंदता । तयांचिया ॥२७०॥

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः ।
तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥२०॥

तयांचिया ठायीं । कामाचा [5] रिघाव । कर्मफलीं हांव । म्हणोनियां ॥२७१॥
कामाचा संसर्ग । घडे तयां जेव्हां । मालवे तो तेव्हां । ज्ञान-दीप ॥२७२॥
पार्था, ज्ञानदीप । मालवतां देख । तयांसी काळोख । अंतर्बाह्य ॥२७३॥
म्हणोनि पासीं च । असोनि मी दूर । जाहलों साचार । तयांलागीं ॥२७४॥
मग सर्वभावें । पूजिती ते देख । दैवतें अनेक । इष्ट जीं जीं ॥२७५॥
आधीं च ते पार्था । प्रकृति-आधीन । वरी झाले दीन । भोगासाठीं ॥२७६॥

---

* परिशिष्ट पहा. १ पहांट. २ ज्ञानरूपी उगवत्या सूर्याचा. ३ खजिना. ४ पुष्कळ. ५ शिरकाव; रहिवास.

कौतुकें ते पाहें । मग [१] भोगासक्त । पूजिती दैवत । कैशा रीती ।।२७७।।
पाळिती नियम । जे जे आवश्यक । जमविती देख । पूजाद्रव्यें ।।२७८।।
यथाविधि कैसें । करावें अर्पण । घेती ते जाणोन । विहित जें ।।२७९।।

यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ।।२१।।

जो जो दुजें जें जें । पूजावें दैवत । म्हणोनि इच्छीत । मनोभावें ।।२८०।।
तयाची ती [२] चाड । पुरविता साच । असें एक मी च । धनंजया ।।२८१।।
परी देवी देव । सर्व मी च होय । ऐसा हि निश्चय । नसे त्यांचा ।।२८२।।
म्हणोनियां नाना । देवतांचे ठायीं । धरी जो हृदयीं । भिन्नभाव ।।२८३।।

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।
लभते च तत: कामान्मयैव विहितान्हि तान् ।।२२।।

आणि होवोनियां । मग श्रद्धायुक्त । पूजी तें दैवत । यथायोग्य ।।२८४।।
तोंवरी तो पार्था । करी [३] आराधन । होय जों संपूर्ण ।। कार्यसिद्धि ।।२८५।।
ऐसें जयें जें जें । इच्छावें केवळ । तें तें लाभे फळ । तयालागीं ।।२८६।।
परी तें सकळ । मज चि पासोन । मिळे तया जाण । धनुर्धरा ।।२८७।।

अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।
देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ।।२३।।

जाणती ना मातें । सर्वथा ते भक्त । गेले कल्पनेंत । गुंतोनि जे ।।२८८।।
म्हणोनियां फळ । पावती कल्पित । जें का नाशिवंत । स्वभावें चि ।।२८९।।
काय सांगूं फार । ऐसें जें भजन । होय तें साधन । [४] भवाचें चि ।।२९०।।
आणि फळभोग । तयांचा संपूर्ण । दिसे जैसें स्वप्न । क्षणमात्र ।।२९१।।
राहो [५] उहापोह । असो कोणाचें हि । दैवत कैसें हि । पंडुसुता ।।२९२।।
परी देवतांचें । करी जो पूजन । देवत्व चि जाण । लाभे तया ।।२९३।।
आणि जे मद्भक्त । तन मन प्राण । भावें समर्पून । माझ्या ठायीं ।।२९४।।
चालविती नित्य । माझें चि भजन । मी चि होती जाण । देहान्तीं ते ।।२९५।।

---

१ विषयांत गुरफटलेले. २ इच्छा. ३ पूजा; उपासना. ४ संसाराचें च. ५ चर्चा.

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः ।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥२४॥

परी प्राणी तैसें । [१] नाचरोनि तेथ । दूरावती व्यर्थ । स्वहितासी ॥२९६॥
तळहातींचिया । जळीं पोहूं जाणें । तैसें तें करणें । तयांचें गा ॥२९७॥
तोंडा वज्रमिठी । पाडावी कां तरी । बुडतां सागरीं । अमृताच्या ॥२९८॥
मग [२] थिल्लरींचें । आठवोनि पाणी । झुरावें कां मनीं । सांगें बापा ॥२९९॥
अमृतामाजीं हि । रिघोनि मरावें । ऐसें हें करावें । कासयासी ॥३००॥
तरी सुखें कां गा । व्हावें ना अमर । राहोनि अपार । अमृतीं त्या ॥३०१॥
तैसा फलाशेचा । पिंजरा फेंकोन । पंख ते लावोन । प्रतीतीचे ॥३०२॥
मनासी मानेल । ऐसा निरंतर । करूं ये संचार । सुखें जेथें ॥३०३॥
मारिली भरारी । किती जरी उंच । तरी लागे ना च । पार ज्याचा ॥३०४॥
तया * चिदाकाशीं । कराया संचार । समर्थ साचार । कां न व्हावें ? ॥३०५॥
मापावें कां पार्था । मज अमापातें । व्यक्त अव्यक्तातें । मानावें कां ॥३०६॥
शिणावें कां नाना । साधनें करोन । असतां मी पूर्ण । स्वयंसिद्ध ॥३०७॥
परी धनंजया । बोल हे साद्यंत । घेतां विचारांत । ऐसें वाटे ॥३०८॥
कीं ह्या [३] जडजीवां । विशेषेंकरोन । उमजे ना खूण । येथींची ही ॥३०९॥

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृत्तः ।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥२५॥

पाहें पार्था * योग–। मायेच्या पडळें । सर्वथा आंधळे । जाहले हे ॥३१०॥
म्हणोनि स्वरूप–। ज्ञान-प्रकाशांत । मातें असमर्थ । पहावया ॥३११॥
एऱ्हवीं मी नाहीं । ऐसी वस्तु कोण । जळ रसावीण । [४] संभवे का ॥३१२॥
सांगें कवणातें । शिवे ना पवन । व्यापी ना गगन । कोणालागीं ? ॥३१३॥
असो हें सर्वत्र । विश्वीं एक मी च । भरोनियां साच । राहिलों गा ॥३१४॥

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ।
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥२६॥

---

* परिशिष्ट पहा. १ न आचरितां. २ डबक्यांतील. ३ मंदबुद्धि जीवांना. ४ असणें शक्य होईल कां ?

जगीं जे जे प्राणी । होवोनियां गेले । माझ्या चि पावले । स्वरूपीं ते ।।३१५।।
आणि जे जे कोणी । जगीं [१] विद्यमान । मद्रूप चि जाण । ते हि सर्व ।।३१६।।
ते हि मजहून । वेगळे नाहींत । होणार जे येथ । पुढें पार्था ।।३१७।।
ए-हवीं केवळ । बोल चि हा देख । नाहीं कांहीं एक । होत जात ।।३१८।।
ऐसा अखंडित । असतां मी नित्य । संसार चि सत्य । वाटे जीवां ।।३१९।।
तयाचें कारण । वेगळें चि जाण । प्रसंगें सांगेन । ऐक आतां ।।३२०।।

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत ।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप ।।२७।।

धनंजया, काया । आणि [३] अहंकार । आलीं परस्पर । प्रेमरंगीं ।।३२१।।
तयां चि पासोन । जन्मली गा देख । इच्छा नामें एक । कुमारिका ।।३२२।।
मग कामाचिया । येतां तारुण्यांत । द्वेषाशीं लागत । लग्न तिचें ।।३२३।।
* द्वन्द्वमोह नामें । एक पुत्ररत्न । प्रसवलें जाण । जोडपें तें ।।३२४।।
तया पुत्रालागीं । पोशिलें साचार । मग अहंकार–। आजोबानें ।।३२५।।
जो का द्वन्द्वमोह । सर्वदा केवळ । असे प्रतिकूळ । धैर्यालागीं ।।३२६।।
आशारसें जो का । होवोनियां पुष्ट । नावरे [२] उन्मत्त । * निग्रहासी ।।३२७।।
असंतोषरूपी । मद्यें माजोनियां । विषयांचे शय्या–। गृहामाजीं ।।३२८।।
[३] विकृतीच्या संगें । जो का रममाण । होय रात्रंदिन । धनुर्धरा ।।३२९।।
ऐशा तयें अंत:–। शुद्धीचिये [४] वाटे । पेरोनियां कांटे । विकल्पाचे ।।३३०।।
निषिद्ध कर्मांचे । मग आडमार्ग । काढोनियां चांग । [५] रूळविले ।।३३१।।
तेणें योगें प्राणी । गेले भांबावून । पडले गहन । [६] भवारण्यीं ।।३३२।।
तों चि तेथें महा–। दु:खांचे आघात । येती धुंडाळीत । तयांलागीं ।।३३३।।

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता: ।।२८।।

ऐसे विकल्पाचे । तीक्ष्ण कांटे फोल । देखोनि सरळ । मार्गामाजीं ।।३३४।।
न होती सर्वथा । जे का मतिभ्रष्ट । न सोडिती वाट । सत्कर्माची ।।३३५।।

---

१ हयात असलेले. २ माजलेला. ३ विकारांच्या. ४ वाटेवर. ५ रूढ केले.
६ संसाररूपी अरण्यांत. * परिशिष्ट पहा.

एकनिष्ठारूप । पाउलें टाकीत । टोंकें रगडीत । विकल्पाचीं ॥३३६॥
महापातकांचें । सांडोनि अरण्य । धांव घेती पुण्य–। मार्गें जे का ॥३३७॥
[१] वाटवधेयांतें । ऐसें चुकवोन । माझें सन्निधान । पावती ते ॥३३८॥

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये ।
ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥२९॥

जन्ममरणाची । उरूं नेदी वार्ता । ऐसें असे पार्था । साधन जें ॥३३९॥
दैवयोगें तया । साधनाचे ठायीं । उपजली पाहीं । आस्था ज्यांची ॥३४०॥
तयांतें संपूर्ण । परब्रह्मरूप–। फळें फलद्रूप । होय तें चि ॥३४१॥
पिकतां तें फळ । ऐसें एके वेळे । मग रस गळे । पूर्णतेचा ॥३४२॥
कृतकृत्यतेनें । तिये वेळीं मग । जाय सर्व जग । भरोनियां ॥३४३॥
जी का ब्रह्मस्थिति । स्वभावतां देख । फिटे अनोळख । तियेची गा ॥३४४॥
[२] कर्म-प्रयोजन । संपोनियां अंतीं । लाभे मनःशांति । निरंतर ॥३४५॥
व्यापारउद्यमीं । भांडवल मी च । असें जया साच । धनंजया ॥३४६॥
तया अध्यात्माचा । ऐसा लाभ होय । [३] भेद-दैन्य जाय । सांडोनियां ॥३४७॥
आणि उत्कर्षातें । पावे साम्यबुद्धि । होतसे [४] समृद्धि । ऐक्यरूप ॥३४८॥

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।
प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥३०॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगो नाम
सप्तमोऽध्यायः ॥७॥

अर्जुना जयांनीं । प्रतीतीच्या द्वारा । जाणिलें शरीरा–। सह मातें ॥३४९॥
तेविं जीवासह । माझें ज्ञान भलें । करोनि घेतलें । परिपूर्ण ॥३५०॥
आणि * अधियज्ञा । मज ज्ञान-बळें । जयांनीं देखिलें । यथार्थत्वें ॥३५१॥
एवं * साधिभूता । * साधिदैवा मातें । जाहले जाणते । * साधियज्ञा ॥३५२॥
देह-वियोगाचें । पावती ना दुःख । पुरुष ते देख । स्वभावें चि ॥३५३॥

---

१ वाटमारेपणा करणारास. २ कर्माचा हेतु. ३ भेद दिसणें हेंच दारिद्र्य. ४ भरभराट.
*परिशिष्ट पहा.

ठाकतां समीप । [१] प्रयाणाचा काळ । उडे खळबळ । प्राणियाची ।।३५४।।
आणि तयाची ती । पाहोनियां स्थिति । इतर हि होती । भयभीत ।।३५५।।
परी नेणों कैसें । काय साधे तयां । गेले जडोनियां । मद्रूपीं जे ।।३५६।।
होतां लगबग । पार्था, अंतकाळीं । माझ्या चि जवळी । राहती ते ।।३५७।।
ऐसे जे [२] निष्णात । होती ज्ञानी भक्त । ते चि स्थिरचित्त । योगी जाण ।।३५८।।
तंव देवें मागें । केलें निरूपण । तेथें होतें मन । अर्जुनाचें ।।३५९।।
म्हणोनि ह्या शब्द-। रूप [३] कुपीखालीं । नव्हती अंजुळी । अवधानाची ।।३६०।।
तेथें तीं तद्ब्रह्म-। वाक्यरूप फळें । ज्यांचा दरवळे । भाव-गंध ।।३६१।।
ऐसीं होतीं देखा । रसाळ बहुत । जीं का विविधार्थ-। रूप रसें ।।३६२।।
सहज कृपेचा । मंदवात वाहे । कैसा डोलताहे । कृष्णवृक्ष ।।३६३।।
तेणें वाक्यफळें । पडलीं अवचित । [४] श्रवणखोळेंत । अर्जुनाच्या ।।३६४।।
कैसीं जणूं तत्त्व-। ज्ञान-सिद्धान्ताचीं । घडलीं तीं साचीं । वाक्य-फळें ।।३६५।।
चुबकळोनियां । ब्रह्मरसामाजीं । मग घोळिलीं जीं । महानंदें ।।३६६।।
देखोनि तयांचें । निर्मळ सौंदर्य । गेला धनंजय । भुलोनियां ।।३६७।।
भावार्थाचा [५] गाभा । लाभावा सकळ । जाहली प्रबळ । इच्छा त्यासी ।।३६८।।
मग तयाचे ते । डोहळे ज्ञानाचे । विस्मयामृताचे । घेती घोट ।।३६९।।
तेणें सुखें मग । भरोनियां जात । वांकुल्या दावीत । स्वर्गलोका ।।३७०।।
आणि तयाचिया । हृदयान्तरांत । गुदगुल्या होत । आनंदाच्या ।।३७१।।
वाक्यफळांचिया । बाह्य सौंदर्याचें । ऐसें सुख साचें । भोगूं लागे ।।३७२।।
तों चि रसरुचि । चाखावया भली । उत्कंठा लागली । तयालागीं ।।३७३।।
अनुमानाचिया । तळहातावरी । मग झडकरी । घेवोनि तीं ।।३७४।।
अनुभवाचिया । मुखामाजीं साच । जंव एकदांच । घालूं पाहे ।।३७५।।
तंव विचाराच्या । जिव्हेनें तीं तेथ । होई असमर्थ । चोखावया ।।३७६।।
आणि तर्काचिया । दातें चावूं जातां । तया तीं सर्वथा । फुटती ना ।।३७७।।
जाणोनि हें तेणें । न चोखितां खालीं । ठेवोनियां दिलीं । होतीं तैसीं ।।३७८।।

---

१ मृत्यूची वेळ.　२ प्रवीण.　३ बाटली (कांचेची); शिशी.　४ कानाच्या झोळींत.　५ रहस्य; सार.

चमत्कारोनियां । मागुतीं तो म्हणे । काय तारांगणें । जळींचीं हीं ! ॥३७९॥
सुलभ सुंदर । अक्षरांनीं भला । गेलों [१] ठकविला । कैसा येथें ॥३८०॥
नातरी अक्षरें । नव्हेत हीं साच । वाटती घड्या च । आकाशाच्या ॥३८१॥
बुद्धीचिया बळें । घेऊं जातां ठाव । तियेचा रिघाव । नाहीं तेथें ॥३८२॥
मग जाणायाची । गोष्ट ती तों दूर । करोनि विचार । मनीं ऐसा ॥३८३॥
यादवेन्द्राकडे । वळवोनि दृष्टि । पुन्हां तो किरीटी । प्रार्थी तया ॥३८४॥
म्हणे देवा ब्रह्म–। अध्यात्मादि सात । [२] पदें एकत्रित । ऐकिलीं जीं ॥३८५॥
तयांचें तों नाहीं । कोणा [३] आकलन । ऐसीं विलक्षण । वाटती तीं ॥३८६॥
एऱ्हवीं जीं नाना । प्रमेयें गहन । घ्यावीं तीं जाणोन । म्हणोनियां ॥३८७॥
तयांचें श्रवण । केलें सावधान । तरी का तीं पूर्ण । आकळती ? ॥३८८॥
परी हें तों नव्हे । तैसें साधारण । कैसा विलक्षण । बोल तुझा ॥३८९॥
देखतां चि देवा । शब्द–समुदाय । वाटला विस्मय । विस्मयासी ॥३९०॥
जंव कानाचिया । झरोक्यामधून । शब्दाचे किरण । शिरती ना ॥३९१॥
तंव तें तेथें च । माझें अवधान । गुंतलें संपूर्ण । चमत्कारें ॥३९२॥
पदांचा त्या अर्थ । घ्यावा समजोन । उत्कंठा लागोन । राहिली ही ॥३९३॥
ऐसें सांगतां हि । जातसे जो वेळ । तो हि साहवेल । ऐसें नाहीं ॥३९४॥
म्हणोनियां आतां । विनंति ही देवा । सत्वर सांगावा । गूढार्थ तो ॥३९५॥
घेवोनि मागील । ऐसें [४] प्रत्यंतर । पुढें हि नजर । देवोनियां ॥३९६॥
सर्व अभिप्राय । [५] लक्षोनियां नीट । करोनि प्रकट । [६] उत्कटेच्छा ॥३९७॥
चातुर्यें देवासी । कैसें विनवावें । सर्व हें स्वभावें । जाणे पार्थ ॥३९८॥
कृष्णहृदयासी । मारावया मिठी । कैसा तो किरीटी । सिद्ध झाला ॥३९९॥
भिडेची मर्यादा । नोलांडितां तैसी । देखा श्रीगुरूसी । पुसे कैसा ॥४००॥
पुसों जातां दक्ष । कैशापरी व्हावें । हें तों सर्व ठावें । तयासी च ॥४०१॥
आतां तयाचें तें । प्रश्न विचारणें । त्यावरी बोलणें । सर्वज्ञाचें ॥।४०२॥
संजय तो प्रेमें । सांगेल ही मात । परिसावी चित्त । देवोनियां ॥४०३॥

---

१ फसविला. २ (अर्थपूर्ण) शब्द. ३ कळणें. ४ अनुभव. ५ लक्षांत घेऊन. ६ उत्कंठा.

१२

सरळ सुंदर । मराठी हे बोल । पाहोनि निवेल । आधीं दृष्टि ।।४०४।।
कानाचिया मना । मग सावकाश । होईल संतोष । ऐकोनि ते ।।४०५।।
बुद्धीच्या जिव्हेनें । बोलाचें ह्या सार । सर्वथा साचार । न चाखितां ।।४०६।।
देखा शब्दाचिया । सौंदर्यें केवळ । तृप्ति पावतील । सर्वेंद्रियें ।।४०७।।
उधळोनि गंध । मालतीच्या कळ्या । होती [1] घ्राणेन्दियां । सौख्यदायी ।।४०८।।
पाहोनि तयांची । परी [2] रम्याकृति । न लाभे का तृप्ति । नेत्रांसी हि ।।४०९।।
तैसें मराठीचें । देखोनि [3] लावण्य । सर्वेंद्रियें धन्य । होवोनियां ।।४१०।।
मग स्वभावें चि । सिद्धांताचें [4] सार । बुद्धीसी सत्वर । आकळेल ।।४११।।
ऐसा चि बोलेन । [5] शब्दातीत भाव । म्हणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ।।४१२।।

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी

सप्तमोऽध्याय: ।

हरये नम: । हरये नम: । हरये नम: ।

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

१ नाकाला.　२ सुंदर आकार.　३ सौंदर्य.　४ रहस्य.　५ शब्दाच्या पलीकडील.